अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,
कारागृह व सुधार सेवा, महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय,
जुनी मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, पुणे-१
दुरध्वनी क्र. : ०२०/२६१२५८७८
फॅक्स क्र. : ०२०/२६१२३५६३
Email I.D. : igoffice.hm-mh@gov.in

---

जा.क्र. न्यावि/मुख्याध्यापक/विपश्यना/ 4280 /२०१६, कक्ष ९(क), पुणे-१,दिनांक :२८.०४.२०१६

**विषय:- राज्यातील कारागृहांमधील बंद्यांसाठी विपश्यना रिसर्च इन्स्टीटयूट,धम्मगिरी, इगतपुरी,नाशिक या संस्थेमार्फत विपश्यना शिबीरांचे आयोजन करणेबाबत...**

**संदर्भ:-** शासन परिपत्रक क्रमांक : जेएलएम-१०११/प्र.क्र.२७३/पीआएस-२, दिनांक ०७ सप्टेंबर, २०११

१) उपरोक्त शासन परिपत्रकानुसार बंदीजनांच्या मानसिकतेत सशक्त बदल घडविण्यासाठी राज्यातील सर्व कारागृहांमध्ये बंद्यांसाठी **विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट, धम्मगिरी, इगतपुरी, जिल्हा नाशिक** या संस्थेमार्फत विपश्यना शिबीरांचे आयोजन करणेबाबत सर्व कारागृह उपमहानिरीक्षक यांनी स्वतः पुढाकार घेऊन हा उपक्रम यशस्वी करावा, असे आदेशित केलेले आहे.

२) विपश्यना साधनेच्याद्वारे मनाची पिडा दूर होऊन मन एकाग्र होणे व अपप्रवृत्ती दूर करून माणूस सत्प्रवृत्ती व सदाचरण धारण करून मन:शांती मिळवू शकतो. विपश्यना साधनेच्या अभ्यासामुळे विनयशीलता व काम करण्यातील आवड वाढलेली दिसून येते, तसेच एकंदरीत सहकार्य करण्याची प्रवृत्ती वाढते.

३) विपश्यना ध्यान साधना ही सर्वांच्या जीवनात सकारात्मक बदल करणारी असल्याने व अशा उपक्रमांचा बंद्यांचे पुनर्वसनाच्या दृष्टीने निश्चितच उपयोग होऊ शकेल, या हेतुने यापूर्वी कारागृहातील बंद्यांसाठी विपश्यना शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात भाग घेतलेल्या सर्वांच्या मनोवृत्तीत मोठ्या प्रमाणात सकारात्मक परिणाम होऊन त्यांच्या मानसिक आरोग्यात सुधारणा झाल्याचे दिसून आले होते.

४) उपरोक्त शासन परिपत्रकातील सुचनेनुसार राज्यातील सर्व विभागीय कारागृह उपमहानिरीक्षक यांनी आपल्या विभागांतर्गत कारागृहातील बंद्यांसाठी **विपश्यना रिसर्च इन्स्टिटयुट, धम्मगिरी, इगतपुरी, जिल्हा नाशिक** या संस्थेमार्फत नियमित स्वरूपात विपश्यना शिबीरांचे आयोजन करणेबाबत स्वतः पुढाकार घेऊन हा उपक्रम यशस्वी करावा.

**पान २ वर...**

५) विपश्यना शिबीराचे आयोजन करण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. राज्यातील सर्व कारागृहात बंद्यांसाठी विपश्यना शिबीराचे आयोजन करावे.

२. विपश्यना साधना शिकण्यासाठी किमान १० दिवस विपश्यना केंद्रावर राहणे आवश्यक आहे.

३. कारागृह परिसरात जेथे ध्यान साधना करणाऱ्या बंदीस इतरांचा संपर्क होणार नाही, अशा ठिकाणी किंवा एखाद्या कोपऱ्यात विपश्यना केंद्र समकक्ष व्यवस्था निर्माण करणे. सदरील विपश्यना केंद्रात निवास, शौचालय, स्वयंपाकघर, जेवण, ध्यानसाधनेसाठी हॉल इ.ची व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे. सदरील व्यवस्था किमान १०० लोकांची अथवा आवश्यकतेप्रमाणे करावी.

४. कारागृह अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी विपश्यना शिबीरांचे कार्यक्रम आखणे व विपश्यना रिसर्च इन्स्टिट्युट मार्फत चालविण्यात येणाऱ्या केंद्रावर त्यांना प्राधान्याने प्रवेश मिळवून देणे.

५. कारागृह परिसरात विपश्यना साधनेसाठी स्वतंत्र क्षेत्र निश्चित करण्यात यावे व त्याचा उपयोग अन्य कामासाठी करू नये.

६. विपश्यना शिबीरे ही कारागृहात स्वतंत्र ठिकाणी आयोजित करण्यात येत असल्याने व आहे त्याच स्वयंपाकगृहात स्वयंपाकाची वेगळी व्यवस्था लागत असल्याने स्वयंपाकासाठी लागणारी भांडी, इंधनाचा एकवेळचा खर्च विशेष बाब म्हणून मंजूर करावा.

७. विपश्यना शिबीराचे संचालनासाठी विपश्यना रिसर्च इन्स्टिट्युट यांचेकडून वेळोवेळी सहाय्यक आचार्यांची व धर्मसेवक अथवा धर्मसेविका यांची नियुक्ती करवून घेणे व आलेल्या सहा.आचार्य व धर्मसेवक/सेविकांची स्वतंत्र निवास व भोजनाची नियमानुसार योग्य ती व्यवस्था करणे.

८. विपश्यना शिबीराचा आढावा व अडचणींवर उपाययोजना करण्यासाठी संबंधित कारागृह अधीक्षकांच्या अध्यक्षतेखाली विपश्यना शिबीर केलेला कारागृह अधिकारी (सचिव), विपश्यना संस्थेचे दोन प्रतिनिधी (सदस्य) व किमान दोन विपश्यना शिबीरात सहभागी झालेले दोन बंदी (सदस्य) इत्यादीं समावेश असलेली कारागृह समिती स्थापना करावी. सदरील समितीची बैठक दरमहा आयोजित करावी व बैठकीचा वृत्तांत सर्व संबधितांना पाठवावा.

**पान ३ वर...**

९. विपश्यनेच्या माध्यमातून सुखी, संतुलित व अर्थपूर्ण जीवन जगण्याचे कौशल्य प्रत्येकात निर्माण करण्याच्या हेतूने महाराष्ट्र कारागृह वार्तापत्रात प्रसिध्दीसाठी वृत्त व लेख पाठविणे.

१०. शिबीर कालावधीत सर्वसहभागी साधकांना भोजन देण्यासाठी विपश्यना संस्थेच्या प्रतिनिधींच्या मार्गदर्शनाखाली आहारसूची तयार करावी व त्यानुसार व्यवस्था करावी.

११. विपश्यना संस्थेतर्फे **श्री. दिलीप देशपांडे, विपश्यना आचार्य** हे समन्वयकाचे काम पाहतील. संपर्कासाठी त्यांचा पत्ता खालीलप्रमाणे आहे.

**पत्ता:- विपश्यना इंटरनॅशनल अकॅडमी,**
**इगतपुरी, ता.जि. नाशिक, पिन-422403,**
**दुरध्वनी क्र. 0253-244086, 243712,**
**फॅक्स : 0253-244176**
**भ्रमणध्वनी क्र 09422265919,**
**Email: dilip.dhammgiri@gmail.com,**

१२. बंद्यांनी विपश्यना शिबीर पूर्ण केल्यानंतर विपश्यनेचा लाभ प्रत्यक्ष जीवनात उतरविण्यासाठी दररोज सकाळी व संध्याकाळी एक तास विपश्यना सराव करणे अपेक्षित आहे. त्यासाठी इच्छुक बंद्यांना योग्य त्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

१३. ज्या बंद्यांनी शिबीर पूर्ण केलेले आहे. त्यांनी पुन्हा शिबीर करणे, तसेच शिबीरात सेवा देण्यासाठी प्रोत्साहित करावे.

१४. विपश्यना शिबीराचे आयोजनाबाबतवी आवश्यक ती कार्यप्रणाली तयार होईपर्यंत तात्काळ सर्व कारागृहात बंद्यांसाठी आनापान शिबीराचे आयोजन करावे. या अंतर्गत अंदाजे ३ तासांचे आनापान संबंधित प्रशिक्षण दिले जाईल. यानंतर आनापानचा सराव दररोज वेळोवेळी करता येऊ शकतो. आनापानचा सराव १० मिनिटांचा आहे. याबाबत लागणाऱ्या आवश्यक व्यवस्था विपश्यना प्रतिनिधींच्या माध्यमातून तयार करून घेण्यात याव्यात.

२२.४.१६

**(डॉ एस.एस.सोळूंके)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (का.)(मु.),
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

**पान ४ वर...**

**प्रति,**

विशेष पोलीस महानिरीक्षक (कारागृह), दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई-८
कारागृह उपमहानिरीक्षक, पश्चिम विभाग, येरवडा, पुणे-६
कारागृह उपमहानिरीक्षक, पूर्व विभाग, नागपूर
कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग, औरंगाबाद

**प्रत :- माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव**

अधीक्षक (सर्व)
मध्यवर्ती/जिल्हा/विशेष/महिला/खुले कारागृह
प्राचार्य,
दौ.जा.तु.अ.प्र.म., येरवडा, पुणे-६/ किशोर सुधारालय, नाशिक